निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
सोमवार
२३ फेब्रुवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३५८ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

# जनसामान्यांना दिलासा अन् आर्थिक शिस्त!

## दिवंगत अजितदादांच्या स्वप्नातील अर्थसंकल्प मांडणार; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा निर्धार

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/राज्याचा आगामी अर्थसंकल्प हा केवळ आकड्यांचा खेळ नसेल, तर तो जनसामान्यांना दिलासा देणारा आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेला शिस्त लावणारा असेल, असा ठाम विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. विशेष म्हणजे, हा अर्थसंकल्प दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आखलेल्या धोरणांवर आणि त्यांनी सुचवलेल्या मुद्द्यांवर आधारित असेल, अशी भावनिक घोषणाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

दिवंगत अजितदादांच्या कार्याचा गौरव आणि संकल्प

मुख्यमंत्री म्हणाले की, अजितदादांनी या अर्थसंकल्पासाठी मोठी तयारी केली होती. त्यांचा मानस एक उत्तम अर्थसंकल्प मांडण्याचा होता, परंतु दुर्दैवाने ती जबाबदारी आता माझ्यावर आली आहे. त्यांनी सुचवलेले सर्व मुद्दे आणि सूचनांचा समावेश करून आम्ही त्यांच्या स्वप्नातील प्रगत महाराष्ट्र घडवण्याच्या दिशेने पाऊल टाकत आहोत.

केंद्राकडून महाराष्ट्राच्या तिजोरीत भरघोस मदत

राज्याच्या विकासासाठी केंद्र सरकारकडून मोठे पाठबळ मिळाल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. कर वाटप: केंद्राकडून महाराष्ट्राला ९८ हजार ३०६ कोटी रुपये मिळणार आहेत.रेल्वे आणि कॉरिडॉर: रेल्वे अर्थसंकल्पात २३ हजार कोटींची तरतूद असून दोन हायस्पीड कॉरिडॉर मंजूर झाले आहेत.रोजगार: व्हिबी जीरामजी योजनेतून मनुष्यबळ दिवसांत वाढ केल्यामुळे अतिरिक्त १४०० कोटी रुपये राज्याला मिळणार आहेत.

एआय' (AI) क्रांती: शेती होणार हायटेक

महाराष्ट्राने कृषी क्षेत्रात आधुनिकतेची कास धरली असून, 'एआय फॉर ग्रीकल्चर' ही आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली जात आहे.महाविस्तार प: राज्यातील ३० लाख शेतकरी या पचा वापर करत असून, आता त्यात भिल्ली भाषेचाही समावेश करण्यात आला आहे.बचत: एआयच्या वापरामुळे शेतीचा उत्पादन खर्च २५ ते ४० टक्क्यांपर्यंत कमी होणार आहे.

पायाभूत सुविधा आणि कारवाईचा बडगा (उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे)

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्याच्या प्रगतीचा पाढा वाचताना विरोधकांनाही कडक शब्दांत सुनावले.

गुंतवणूक: दावोसमध्ये झालेल्या ३० लाख कोटींच्या करारातून ४० ते ५० लाख रोजगार निर्माण होतील.

कडक कारवाई: एमएमआरडीएच्या कामातील दुर्घटनेनंतर जबाबदार अधिकाऱ्यांचे निलंबन आणि संबंधित कंपन्यांना ६ कोटींचा दंड ठोठावण्यात आला आहे. 'सेफ्टी ऑडिट'चे आदेशही देण्यात आले आहेत.

जलयुक्त शिवार व सिंचन: ९० हजार कोटींच्या सिंचन प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून मराठवाडा-विदर्भाचा दुष्काळ हटवण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.



अजितदादांच्या विमान अपघाताची 'सीबीआय' चौकशी

अजित पवार यांच्या दुर्दैवी विमान अपघाताबाबत मुख्यमंत्र्यांनी मोठी माहिती दिली. या प्रकरणाची आता सीबीआय (उइख) चौकशी होणार असून, 'व्हॉइस रेकॉर्ड' तपासण्यासाठी परदेशातील तज्ज्ञ कंपन्यांची मदत घेतली जाणार आहे. या प्रकरणातील तांत्रिक बाबींची सखोल तपासणी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

१५ महत्त्वाची विधेयके मांडणार

उद्यापासून (२३ फेब्रुवारी) सुरू होणाऱ्या या अधिवेशनात १५ महत्त्वाची विधेयके मांडली जाणार आहेत. गोरगरीब आणि सामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी हे अधिवेशन चार आठवडे चालेल, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

अजितदादांनी ११ वेळा अर्थसंकल्प मांडून राज्याला दिशा दिली. तोच वारसा पुढे नेत आम्ही सर्वांगीण विकासाचा अर्थसंकल्प मांडू.

**- उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार**

## एकल मातेच्या संघर्षाला न्यायालयाचा सलाम: मुलाच्या ओळखीसाठी आईच पूर्ण पालक

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने एका ऐतिहासिक निकालात एकल मातेला (Single Mother) मुलाचे संपूर्ण पालक म्हणून मान्यता दिली आहे. न्यायालयाने म्हटले आहे की, मुलाच्या नागरी ओळखीसाठी एकल मातेला पूर्ण पालक म्हणून मान्यता देणे हे दान नसून ते संविधानाप्रती असलेली निष्ठा आहे. हा निर्णय म्हणजे पितृसत्ताक अनिवार्यतेकडून घटनात्मक निवडीकडे आणि वंश परंपरेकडून प्रतिष्ठेच्या अधिकाराकडे टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. या निकालामुळे आता मुलांच्या शालेय रेकॉर्डवरून अनुपस्थित वडिलांचे नाव आणि आडनाव काढून आईचे नाव, आडनाव आणि जात लावण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, ज्यामुळे देशभरातील एकल मातांना मोठा दिलासा मिळाला आहे.



हा महत्त्वपूर्ण निकाल न्यायमूर्ती विभा कनकनवाडी आणि न्यायमूर्ती हितेंद्र वेणेगावकर यांच्या खंडपीठाने एका १२ वर्षीय मुलीच्या याचिकेवर दिला आहे. पीडित आईने आपल्या मुलीच्या शालेय रेकॉर्डमधून तिच्या बलात्कारी वडिलांचे नाव व 'मराठा' ही जात वगळून, स्वतःचे नाव आणि 'महार' (अनुसूचित जाती) ही जात नोंदवण्याची मागणी केली होती. शाळेने ही मागणी नाकारल्यानंतर प्रकरण उच्च न्यायालयात पोहोचले. न्यायालयाने स्पष्ट केले की, जेव्हा आईच मुलाची एकमेव पालक आणि संगोपन करणारी व्यक्ती असते, तेव्हा रेकॉर्डवर वडिलांचे नाव ठेवण्याची सक्ती करणे हे मुलाच्या प्रतिष्ठेच्या आणि सन्मानाने जगण्याच्या अधिकाराचे (अनुच्छेद २१) उल्लंघन आहे. जेथे वडील मुलाच्या जीवनात पूर्णपणे अनुपस्थित आहेत, तेथे त्यांची ओळख मुलावर लादली जाऊ शकत नाही.

## परिक्षा केंद्रवारच प्रकृती बिघडली, थेट रुग्णालयातून पूर्ण केला गणिताचा पेपर....

**आत्ताच एक्सप्रेस**

**आकोला/प्रतिनिधी**/महाराष्ट्रभर नुकत्याच दहावी बोर्डाच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. अनेक विद्यार्थी अगदी मन लावून परीक्षेसाठी वर्षभर तयारी करत असतात. चांगले गुण मिळवण्यासाठी रात्रंदिवस अभ्यास करत असतात. दरम्यान अकोल्यातली मूर्तिजापूर शहरात एका विद्यार्थीनीच्या जिद्दीचे अनोखे उदाहरण पाहायला मिळाले आहे. परीक्षा केंद्रावर गेलेल्या एका विद्यार्थीनीला अचानक भोवळ आली मात्र, तरीही तिने तिचा गणिताचा पेपर दिला. तिच्या



या जिद्दीची खरच दाद दिली पाहिजे, सर्व विद्यार्थांसाठी ती एक प्रेरणादायी उदाहण बनली आहे.

नेमकं काय घडलं?

गणिताचा पेपर देण्यासाठी परीक्षा केंद्रावर गेलेल्या एका विद्यार्थिनीला अचानक भोवळ आली. श्रेया देशमुख असे या विद्यार्थिनीचे नाव असून घटनेनंतर विद्यालय प्रशासनाने तत्काळ तिला जवळच्या खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. अचानक तब्येत बिघडल्याने श्रेयाचा गणिताचा पेपर अपूर्ण राहणार की काय, अशी चिंता निर्माण झाली होती. मात्र पेपर राहिल्याची खंत तिच्याही मनात होती.

थेट रुग्णालयातून दिला पेपर

प्रकृती स्थिर झाल्यानंतर तिने आपला गणिताचा पेपर पूर्ण करण्याची इच्छा व्यक्त केली. विद्यालय प्रशासनाने तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली व विशेष परवानगी मिळवली. डॉक्टरांनी तपासणी करून विद्यार्थिनीची प्रकृती समाधानकारक असल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर आवश्यक वैद्यकीय देखरेखीखाली श्रेयाने थेट रुग्णालयातूनच आपला गणिताचा पेपर पूर्ण केला. विद्यार्थिनीच्या या जिद्दीचे सर्वत्र कौतुक होत असून तिच्या चिकाटीने अनेकांना प्रेरणा मिळाली आहे.

५००० हुन जास्त केंद्रांवर परिक्षा सुरू

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी २०२६ पासून सुरू झाली असून ती १८ मार्च २०२६ रोजी संपणार आहे. हे वेळापत्रक पुणे, नागपूर आणि मुंबईसह सर्व ९ विभागीय मंडळासाठी लागू केले गेले आहे. या परीक्षेसाठी राज्यभारातून १६ लाख १५ हजार ४८९ विद्यार्थ्यांची नोंदणी केली गेली आहे. राज्यभरातील ५,१११ केंद्रांवर या परीक्षा पार पाडल्या जात आहेत. या परीक्षेतील पहिला भाषाविषयक पेपर होता. त्यानंतर २१ फेब्रुवारी रोजी बहुकौशल्य सहाय्यक तंत्रज्ञ, कृषी, यांत्रिक तंत्रज्ञान अशा विविध व्यावसायिक विषयांचे पेपर झाले. त्याशिवाय महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये पेपर वेगवेगळ्या विषयाच्या सुरु आहेत. यामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजीसह इतर माध्यमांचे विद्यार्थी परिक्षा देत आहेत.

अलीकडील १२ वीच्या परिक्षेतील दुर्घटना

महाराष्ट्रात अलीकडेच १० वीच्या परिक्षा सुरु झाल्यात तर काही दिवसांपूर्वीच १२ वीच्या परिक्षाही सुरु झाल्या होत्या. दरम्यान १२ वीच्या विद्यार्थ्याचा ट्रेनमधील अपघातात दुर्दैवी मृत्यु झाला होता. त्यामुळे विद्यार्थ्यांना परिक्षेच जास्त ताण न घेत योग्य काळजी घेऊन परिक्षा घेण्याचं आवाहन केलं जात आहे

## महिला शेतकऱ्यांना डिजिटल संसाधने, माहिती व प्रशिक्षण मिळणे आवश्यक; 'एआय फॉर ग्री परिषदे'त तज्ज्ञांचे मत

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/ एआय हे मानवी बुद्धिमत्तेचा पर्याय नसून सर्वांना संधी देणारे माध्यम ठरू शकते, त्याचा वापर इतर क्षेत्राप्रमाणेच कृषी क्षेत्रासाठीही उपयुक्त आहे. मात्र त्यासाठी महिलांना संसाधने, माहिती व प्रशिक्षण मिळणे अत्यावश्यक आहे. मागणी आधारित, सहभागी पद्धतीने विकसित केलेले जबाबदार एआय शेतीच्या शेवटच्या घटकापर्यंत परिवर्तन घडवू शकते, असा सूर 'कृषी क्षेत्रात जबाबदार एआयचा वापर करून लिंगाधारित डिजिटल दरी कशी भरून काढता येईल' या विषयावर पार पडलेल्या परिसंवादात उमटला.

'महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९' अंतर्गत आयोजित एआय फॉर अग्री या जागतिक कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद व गुंतवणूकदार शिखर संमेलनामध्ये 'कृषी क्षेत्रात जबाबदार एआयचा वापर करून लिंगाधारित डिजिटल दरी कशी भरून काढता येईल' या विषयावर परिसंवाद पार पडला. या परिसंवादात एम.एस. स्वामीनाथन रिसर्च फौंडेशनच्या अध्यक्ष सौम्या रंगनाथन, संचालक मंडळ सदस्य पूर्वी मेहता, ग्रो इंडिगोच्या कार्यकारी संचालक उषा झेहर, पाणी फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ, युनिव्हर्सिटी ऑफ ईस्ट अँग्लिया युनायटेड किंगडमच्या प्राध्यापक (लिंग व विकास अभ्यास) डॉ. नित्या राव, यूएन वुमन, भारत देश प्रतिनिधी कांता सिंह, तसेच पद्मश्री पुरस्कार विजेत्या शेतकरी राहिबाई पोपेरे सहभागी झाल्या.

देशातील अस्थिर शेती व्यवस्था, हवा, पाण्याचे वाढते प्रदूषण आणि मातीच्या खालावलेल्या गुणवत्तेमुळे निर्माण होणाऱ्या पोषण संकटाकडे परिसंवादातील तज्ज्ञांनी लक्ष वेधले. आज अन्न पुरेशा कॅलरी देत असले तरी ते आरोग्यदायी नाही. त्यामुळे कुपोषण, महिलांमध्ये व मुलांमध्ये ॲनिमिया, तसेच लठ्ठपणा, मधुमेह व हृदयरोगांसारख्या असंसर्गजन्य आजारांचे ओझे वाढत आहे. २०४७ पर्यंत भारत विकसित राष्ट्र बनवायचा असेल तर शेती पोषण प्रणालींमध्ये तातडीने सुधारणा आवश्यक असल्याचे डॉ. सौम्या स्वामीनाथन यांनी स्पष्ट केले.

तंत्रज्ञानामुळे उत्पादकता वाढू शकते; मात्र महिलांच्या बाबतीत स्मार्टफोन, इंटरनेट, यांत्रिकीकरण व सल्लागार साधनांपर्यंत पोहोच मर्यादित असल्याने मोठी डिजिटल दरी निर्माण झाल्याचे मत यावेळी मान्यवरांनी मांडले. महिलांच्या नावावर जमीन नसल्यामुळे कर्ज, योजना, पाणीहक्क आणि डेटा सिस्टीमपासून त्या दूर राहतात, हा मुद्दाही चर्चेत ठळकपणे मांडण्यात आला.

पूर्वी उच्च उत्पादनक्षम वाण विकसित करण्यासाठी अनेक दशके लागत होती; मात्र जेनोमिक डेटा व अल्गोरिदमच्या वापरामुळे हे काम काही महिन्यांत शक्य होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. पीक काढणीचा अचूक अंदाज, पीक व रोगनिदानासाठी फोटो-आधारित ॲप्स, पशुधन विक्रीसाठी केवळ छायाचित्रावर आधारित ऑनलाईन व्यवहार आदिमुळे शेतकऱ्यांचे नुकसान कमी होऊन उत्पन्नात वाढ होत असल्याचे सांगण्यात आले.

देशातील सुमारे ४८ टक्के शेती व ७९ टक्के पशुपालन महिलांकडून केले जाते; मात्र बहुतांश एआय मॉडेल्स पुरुष-केंद्रित आणि काही मोजक्या पिकांवरील डेटावर आधारित असल्याने 'डेटा गॅप' निर्माण झाला आहे. एआयमध्ये समावेशकता आणण्यासाठी महिलांच्या कामाशी संबंधित पिके, पशुपालन व स्थानिक पद्धतींचा डेटा समाविष्ट करणे गरजेचे असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.




पाणी फाऊंडेशनमार्फत राज्यात ३० हून अधिक प्रशिक्षण केंद्रे सुरू असून त्यातील ६५ टक्के प्रशिक्षणार्थी महिला आहेत. महाराष्ट्र शासन 'महा कृषी' उपक्रमातून एआय-सक्षम सल्ला लाखो शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवत असल्याची माहिती पाणी फाऊंडेशनचे संजय भटकळ यांनी दिली. महिला शेतकरी हक्कांबाबत धोरणात्मक पावले उचलण्याची गरजही यावेळी मान्यवारांनी अधोरेखित केली.

निसर्ग हिच शाळा आणि निसर्ग हाच शिक्षक

पद्मश्री पुरस्कार प्राप्त शेतकरी राहिबाई पोपेरे यांनी आपण निसर्गासोबत राहूनच सगळ्या गोष्टी कशा शिकल्या हे उपस्थितांना सांगितले. आपल्यासाठी निसर्ग हिच शाळा आणि निसर्ग हाच शिक्षक आहे. परंतु तंत्रज्ञानाने जीवन सुकर केले आहे. पाऊस कधी येईल, त्यानुसार शेतकऱ्यांनी काय नियोजन करावे, हे तंत्रज्ञानाच्या मदतीने आधीच समजण्यासाठी मदत होते. शासनाच्या मदतीने स्थापन केलेल्या बीज बँकेचा प्रवास राहिबाईनी यावेळी सांगितला. रानभाज्यांमध्ये औषधी गुण असतात. त्यामुळे त्याचे महत्व ओळखून रानभाज्यांची लागवड वाढवण्याचे आणि रासायनिक शेती टाळण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## कृषी क्षेत्रात 'एआय' आणि डिजिटल पायाभूत सुविधांचा वापर आवश्यक - पशुसंवर्धन सचिव एन. रामास्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/ जागतिक स्तरावर भारतीय कृषी उत्पादनांची विश्वासार्हता वाढवण्यासाठी 'ट्रेसिबिलिटी' (शोधक्षमता) ही प्रणाली डिजिटल पायाभूत सुविधा म्हणून राबवणे आवश्यक असल्याचे मत पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव एन. रामास्वामी यांनी व्यक्त केले. 'महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९' धोरणातंर्गत 'जागतिक कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आणि गुंतवणूकदार शिखर संमेलन', एआय फॉर ॲग्री २०२६ या परिषदेत 'कृषी-एआय साठी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा' या विषयावरील परिसंवाद मध्ये सचिव एन.रामास्वामी बोलत होते, यावेळी ट्रस्ट झिरो वनचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी प्रबीर मिश्रा, 'आयआयएमडीए'चे ट्रेड ट्रस्ट, सिंगापूरचे उपसंचालक चेंग केन वेई, बेटर कॉटन, इंडियाच्या भारतातील संचालक श्रीमती ज्योती नारायण कपूर, जर्मनी दूतावासच्या कृषी व अन्न विभाग प्रमुख व्होल्कर क्लिमा, रबर बोर्डचे कार्यकारी संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी एम. वसंतगेसेन यांनी सहभाग घेतला.

भारतीय शेती उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत स्थान मिळवून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर एकमेकांशी जोडल्या जाणाऱ्या प्लॅटफॉर्मची निर्मिती करणे. कृषी क्षेत्रात उत्पादनक्षमता वाढ, शेतकऱ्यांचे उत्पन्न वृद्धी आणि कृषी स्थैर्य साध्य करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता हा परिवर्तनाचा प्रभावी साधन ठरू शकते, असा ठाम विश्वास तज्ज्ञांनी व्यक्त केला. एआयचा स्वीकार केवळ तांत्रिक नवकल्पनांवर नव्हे, तर मोजता येणाऱ्या परिणामांवर आणि शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष उत्पन्नवाढीवर अवलंबून असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

शेतीची उत्पादनक्षमता आणि उत्पन्न वाढीसाठी एआयचा लक्षवेधी उपयोग करू शकतो. सर्वसाधारण तंत्रज्ञानाऐवजी पिकनिहाय आणि स्थानिक गरजांनुसार उपाययोजना विकसित करण्यावर भर दिला पाहिजे. या कामामध्ये शासन, खासगी क्षेत्र, संशोधन संस्था आणि वित्तीय संस्था यांच्यातील समन्वय वाढविण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. कर्जसुलभता आणि मूल्यसाखळी कार्यक्षमतेसाठी डेटा-आधारित प्रणालींचा वापर महत्त्वाचा आहे. एकात्मिक कृषी मूल्यसाखळी उभारण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी प्रभावी माध्यम ठरू शकते, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले. सर्वंकष परिसंस्था दृष्टिकोन स्वीकारल्याशिवाय कृषी क्षेत्रात एआयचा व्यापक आणि शाश्वत वापर शक्य नाही, यावर व्यापक सहमती दर्शविण्यात आली. संयुक्त संशोधन, संस्थात्मक सहकार्य आणि दीर्घकालीन गुंतवणूक ही विस्तारासाठी अत्यावश्यक घटक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

महाराष्ट्राच्या एआय-सक्षम कृषी धोरणामध्ये लोकसंख्या-स्तरावरील डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा उभारण्यावर विशेष भर देण्याची गरज आहे.




जागतिक व्यापार व शाश्वततेशी सुसंगत खुल्या आणि परस्पर-सुसंगत प्रणालींची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली. डेटा सुरक्षा, कायदेशीर मान्यता व परस्पर-सुसंगतता हे मूलभूत स्तंभ आहेत, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.या सत्रात जागतिक एआय रणनीतीकार विकास कानुंगो यांनी सूत्रसंचालन केले. तर विविध क्षेत्रातील नामवंत पॅनेल सदस्यांनी कृषी तंत्रज्ञानातील आव्हाने आणि संधींवर चर्चा केली.

# गाडगेबाबांचा झाडू आता कोणाच्या हातात?

**आज २३ फेब्रुवारी. ज्यांनी हातातील 'गाडगे' आणि 'झाडू' या दोन प्रतीकांतून या देशातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि अस्वच्छतेची जळमटं साफ केली, त्या राष्ट्रसंत गाडगे बाबांची जयंती. आज पुन्हा एकदा त्यांच्या प्रतिमेला हार घातले जातील, पेढे वाटले जातील आणि भाषणांचा पाऊस पडेल. पण प्रश्न हा आहे की, बाबांनी ज्या अनिष्ट प्रथांविरुद्ध आयुष्यभर बंड पुकारलं, त्या प्रथा खरंच संपल्या आहेत का? की आपण केवळ सोयीनुसार बाबांना 'स्वच्छता दूत' म्हणून चौकटीत अडकवून टाकलंय?**

**भक्ती की ढोंग? बाबांचा खरा आसूड**

**गाडगे बाबांनी पंढरपूरच्या विठ्ठलात देव शोधला नाही, तर त्यांनी देव शोधला तो दरिद्री नारायणात, आजारी माणसांत आणि भुकेलेल्या प्राण्यांत. आज आपण विठ्ठलाच्या नावावर कोट्यवधींचे मठ बांधतो, पण त्याच मठांच्या बाहेर कचऱ्याचे ढीग साचलेले असतात.**

**बाबा म्हणायचे, तीर्थी धोंडापाणी, देव रोकडा सज्जनी. पण आज आपण सज्जनांना सोडून धोंड्यापाण्याची पूजा करण्यातच धन्यता मानत आहोत. बाबांच्या कीर्तनाचा तडाखा आजच्या ढोंगी समाजव्यवस्थेला आणि बुवाबाजीला आवश्यक आहे.**

**जातीवादाचा कचरा कोण साफ करणार?**

**बाबांनी हातात झाडू घेतला तो केवळ रस्ते स्वच्छ करण्यासाठी नाही, तर माणसाच्या मनातील जातीभेदाचा कचरा उपसण्यासाठी! आज आपण रस्ते चकाचक करतोय, पण सोशल मीडियापासून ते राजकारणापर्यंत जातीवादाचे विष पूर्वीपेक्षा जास्त वेगाने पसरत आहे.**

**बाबांनी आयुष्यभर 'माणूस' हीच जात मानली. जर आपण आजही लग्नाच्या पत्रिकेपासून ते मतदानापर्यंत जात शोधत असू, तर आपल्याला बाबांचे नाव घेण्याचा कोणताही नैतिक अधिकार उरलेला नाही.**

**शिक्षणाकडे पाठ आणि व्यसनांची साथ**

**दगड विकून आपल्या पोरांना शिकवा असा मंत्र देणाऱ्या बाबांच्या महाराष्ट्रात आज तरुणाई व्यसनाच्या गर्तेत अडकली आहे. शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे आणि गरिबांची मुले शिक्षणापासून दूर फेकली जात आहेत. बाबांनी स्वतःच्या हाताने धर्मशाळा आणि शाळा उभारल्या, पण आजच्या सत्ताधीशांना शिक्षणापेक्षा स्मारके उभारण्यात जास्त रस वाटतो, हीच या काळाची शोकांतिका आहे.**

**केवळ जयंती नको, आता 'क्रांती' हवी!**

**गाडगे बाबा हे केवळ एका समाजाचे किंवा फक्त स्वच्छतेचे संत नव्हते; ते क्रांतीचे अग्रदूत होते. आज त्यांच्या जयंतीनिमित्त केवळ 'जय गाडगे बाबा'चा जयघोष करून भागणार नाही. जर आपणः**

**आपल्या मनातील अंधश्रद्धा फेकून देऊ शकत नसू,**

**व्यसनांच्या गुलामगिरीतून मुक्त होऊ शकत नसू,**

**आणि जात-पातीच्या पलीकडे जाऊन माणसाला माणूस म्हणून पाहू शकत नसू...**

**तर आपली ही अभिवादने केवळ 'शाब्दिक फुलोरा' ठरतील. बाबांना अपेक्षित असलेला महाराष्ट्र हा केवळ चकाकणाऱ्या रस्त्यांचा नव्हता, तर तो चकाकणाऱ्या विवेकाचा होता.**

**गाडगे बाबांच्या हातातला झाडू हे प्रतीक होतं - व्यवस्थेला झटकण्याचं, घाणीला उपसण्याचं आणि माणुसकीला जागवण्याचं. आज तो झाडू प्रतीकात्मक स्वरूपात न ठेवता, आपल्या विचारांच्या कृतीत आणण्याची गरज आहे. तरच खऱ्या अर्थाने आपण त्या महामानवाचा वारसा सांगण्यास पात्र ठरू.**

**राष्ट्रसंत गाडगे बाबांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन, पण त्यांच्या विचारांचा वसा घेणाऱ्या कृतीसह!**

# पायोनियर सीबीएसई स्कूलमध्ये 'ह्युमन कॅल्क्युलेटर' गौरव भंडारी यांची जादू;

**गणित कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकरदन/सोपान प्र. सपकाळ/** गणिताची भीती बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि नवनवीन तंत्र शिकू इच्छिणाऱ्या जिज्ञासूंसाठी भोकरदन येथील पायोनियर इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलमध्ये नुकताच एक सुवर्णयोग जुळून आला. जगप्रसिद्ध 'ह्युमन कॅल्क्युलेटर' आणि तब्बल ६ वेळा गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नाव नोंदवणारे **गौरव भंडारी** यांच्या विशेष गणित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेने विद्यार्थ्यांमध्ये गणिताप्रती एक नवा आत्मविश्वास फुंकला आहे.



**गणिताची भीती पळाली; सोप्या तंत्रांनी विद्यार्थी भारावली**

कार्यशाळेच्या सुरुवातीलाच गौरव भंडारी यांनी आपल्या विलक्षण गणनाशक्तीचे प्रात्यक्षिक सादर केले. कॅल्क्युलेटरपेक्षाही वेगाने मोठी गणिते सोडवण्याच्या त्यांच्या कौशल्याने विद्यार्थी आणि शिक्षक थक्क झाले. केवळ आकडेमोड न शिकवता, त्यांनी खालील महत्त्वाच्या मुद्द्यांवर मार्गदर्शन केले: **वेगवान गणिती गणनाः** मोठमोठ्या गुणाकार-भागाकाराच्या क्रिया काही सेकंदात कशा कराव्यात याचे तंत्र त्यांनी सांगितले.**मेंटल मॅथ्स (मानसिक गणित)ः** पेन आणि कागदाशिवाय मनातल्या मनात आकडेमोड करण्याचे कौशल्य त्यांनी विद्यार्थ्यांना शिकवले.**एकाग्रता वाढवणेः** गणिताचा सराव करताना एकाग्रता कशी टिकवून ठेवावी, यावर त्यांनी विशेष भर दिला.**भीतीचे निर्मूलनः** गणिताकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन कसा ठेवावा आणि हा विषय खेळकर पद्धतीने कसा हाताळावा, याचे थेट प्रात्यक्षिक त्यांनी दिले.

विद्यार्थ्यांचा उत्साह आणि सहभाग

कठीण वाटणारे समीकरणे आणि आकडेमोड जेव्हा सोप्या पद्धतीने समोर आली, तेव्हा विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. केवळ व्याख्यान न देता, भंडारी यांनी विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष उदाहरणे सोडवून घेतली. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक वेगळाच आत्मविश्वास पाहायला मिळाला. अनेक विद्यार्थ्यांनी गणिताचा सराव करण्याच्या नव्या पद्धती शिकून घेतल्याचे सांगितले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून, त्यांना अशा जागतिक दर्जाच्या तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे, असे मत शाळा व्यवस्थापनाने व्यक्त केले. पायोनियर स्कूल नेहमीच विद्यार्थ्यांच्या कल्पकता आणि बुद्धिमत्तेला वाव देणारे उपक्रम राबवत असते. गौरव भंडारी यांच्यासारख्या व्यक्तिमत्त्वामुळे विद्यार्थ्यांना गणिताची गोडी लागण्यास मोठी मदत झाली आहे. भविष्यातही आम्ही अशाच प्रेरणादायी कार्यशाळांचे आयोजन करू, असे आश्वासन शाळा व्यवस्थापनाकडून देण्यात आले.

प्रमुख मार्गदर्शक गौरव भंडारी (६ वेळा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड धारक),स्थळ- पायोनियर इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल, भोकरदन.उद्देश गणिताची भीती घालवणे आणि वेगवान आकडेमोड शिकवणे .निकाल- अत्यंत यशस्वी आणि प्रेरणादायी कार्यशाळा एकूणच, ही कार्यशाळा भोकरदन परिसरातील विद्यार्थ्यांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरली असून, यामुळे गणिताकडे पाहण्याचा विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलला आहे.

# नागपूरमध्ये ओसीडब्ल्यूच्या वाढीव पाणी बिलाचा ग्राहकांमध्ये आक्रोश.

जेव्हापासून पाण्याचे सुत्र ओसीडब्ल्यू कंपनीकडे आली तेव्हापासून बिलांच्या बाबतीत ग्राहकांचे हाल बेहाल होतांना दिसत आहे.राज्यातील अनेक महानगरपालिकेने बरेचशे व्यवहार खाजगी कंपन्यांकडे सुपुर्द केल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास होत आहे व यामुळे ग्राहकांचा मनस्ताप वाढत आहे. त्याचे उदाहरण नागपूर महानगरपालिकेमध्ये स्पष्ट दिसून येते. नागपूर महापालिकेतील पाण्याचा व्यवहार ओसीडब्ल्यू या प्रायव्हेट कंपनीकडे गेला तेव्हा पासून नागपूर शहरातील पाणी ग्राहक अत्यंत त्रस्त व चिंतेत आहेत.सरकारने २४/७ पाण्याची योजना अंमलात आणली. परंतु २४ तास पाणी नागपूर शहरात कुठेही दिसत नाही.परंतू ओसीडब्ल्यू मात्र २४ तास पाण्याचे बिल उकळताना दिसते आणि ही बाब वाढीव बिलांवरून उघड दिसून येते.नागपूर शहरात तब्बल २५ हजार पेक्षा जास्त ग्राहकांना वाढीव पाण्याचा फटका बसल्याचे सांगितले जाते. तरीही ओसीडब्ल्यू गप्प बसल्याचे दिसून येते.यावरून स्पष्ट होते की, ओसीडब्ल्यू बिलांच्या बाबतीत ग्राहकांचा छळ करीत आहे.वाढती महागाई आणि त्यात वाढीव पाण्याच्या बिलाची भर ही तर महापालिकेची व ओसीडब्ल्यूची जाहीर लूटच म्हणावी लागेल.नोव्हेंबर महिन्यात महापालिका आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी यांनी बैठक घेऊन ओसीडब्ल्यूला वाढीव बिलांबाबत सुधारणा करण्याचे आदेश दिले होते.अन्यथा दरमहा ३.५ कोटी रूपयांचा दंड आकारला जाईल,असा इशाराही देण्यात आला होता.तरीही सुधारणा न झाल्याने डिसेंबर व जानेवारी महिन्यात ओसीडब्ल्यूवर एकूण ७ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.तरीही ओसीडब्ल्यूमध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा झाल्याचे दिसत नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे.आश्चर्याची गोष्ट म्हणजे पुर्वी महिन्याला ४०० ते ५०० रूपयांपर्यत बिल यायचे परंतु आता ओसीडब्ल्यूने बिलांच्या माध्यमातून ग्राहकांची लुट सुरू केल्याचा सपाटा लावला की काय असे दिसून येते.कारण ४०० ते ५०० रूपयांपर्यत येणारे बिल अचानक ५००० ते ९००० पेक्षा जास्त यायला सुरुवात झाल्याचे दिसून येते.

त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे पाण्याचा वापर वाढलेला नसतांनाही अचानक वाढीव बिले येत आहे.त्यामुळे ओसीडब्ल्यूने वाढीव बिलांच्या बाबतीत ताबडतोब कारवाई करून बिले कमी करण्यात यावे अन्यथा सरकारने ओसीडब्ल्यूला बरखास्त करून पाणी बिलांची संपूर्ण सुत्रे महानगरपालिकेच्या सुपुर्द करावी. त्याचप्रमाणे धक्कादायक बाब म्हणजे नागपूर शहरातील ९ झोनमधील सुमारे ५० वस्त्यांमध्ये दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याची गंभीर बाब पुढे आली आहे.यामुळे सुमारे ४ लाख घरांमधील नागरिकांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला आहे. शहरातील पाणीपुरवठ्याच्या संदर्भात महापौर नीता ठाकरे यांनी १८ फेब्रुवारीला घेतलेल्या आढावा बैठकीत हे धक्कादायक वास्तव कळल्यानंतर तत्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश महापौरांनी दिले.

यावरून स्पष्ट होते की, ओसीडब्ल्यू फक्त बिल वसूलण्याचे काम करीत आहेत. दुषित पाणी किंवा वाढीव बिलांच्या बाबतीत किंवा ग्राहकांच्या सुविधांच्या बाबतीत मौन असल्याचे दिसून येते.या संपूर्ण बाबींकडे ओसीडब्ल्यूने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे अन्यथा सरकारने ओसीडब्ल्यूवर कठोर कारवाई करावी.

**-लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**

# "तो खूप चांगला होता" हा पुरस्कार माणसाला मेल्याशिवाय भेटत नाही...

माणूस जिवंत असताना त्याचं मोल कधीच कळत नाही, हे आपल्या समाजाचं सर्वात कडू आणि तितकंच सत्य चित्र आहे. एखादा माणूस आयुष्यभर प्रामाणिकपणे जगतो, लोकांसाठी धडपडतो, नात्यांसाठी झिजतो, कर्तव्य निभावतो पण त्याच्या पाठीवर कौतुकाची थाप क्वचितच पडते. मात्र तोच माणूस या जगातून निघून गेल्यावर अचानक शब्दांचे पूर येतात तो खूप चांगला होता मनाने मोठा होता कधी कुणाला दुखावलं नाही आणि मग सुरू होतं स्तुतीचं अखंड कीर्तन. जिवंतपणी न मिळालेला सन्मान, मृत्यूनंतर पुष्पहारात गुंडाळून दिला जातो. हा विरोधाभास फक्त भावनिक नाही; तो सामाजिक मानसिकतेचा आरसा आहे. आपण जिवंत माणसाला गृहित धरतो. त्याची सवय होते. त्याची उपस्थिती इतकी नित्याची वाटू लागते की त्याचं असणं आपल्याला विशेष वाटेनासं होतं. घरात आई रोज जेवण करते, ते तिचं कर्तव्य मानलं जातं; वडील आयुष्यभर कष्ट करतात, ते त्यांचं काम समजलं जातं; मित्र संकटात धावून येतो, ते मैत्रीचं नातं म्हणून गृहित धरलं जातं. पण हे सगळं अचानक थांबलं, की त्याचं मूल्य जाणवतं. अनुपस्थितीचं वजन, उपस्थितीपेक्षा जड असतं.


समाजाचं कौतुकाचं गणितही विचित्र आहे. जिवंत असलेल्या व्यक्तीचं कौतुक केलं, तर तो डोक्यावर बसेल अशी भीती. त्याचं यश मान्य केलं, तर आपली किंमत कमी होईल अशी शंका. त्यामुळे आपण शब्द आवरतो, भावना दाबतो, आणि प्रशंसा पुढे ढकलतो. पण मृत्यू आल्यावर स्पर्धा संपते, तुलना संपते, अहंकार शांत होतो आणि मग मोकळेपणाने स्तुती केली जाते. कारण आता त्या व्यक्तीकडून आपल्याला काहीच धोका नसतो. कौतुक रोखून धरण्याची ही वृत्ती नात्यांना आतून पोखरते. ज्या घरात, ज्या कार्यालयात, ज्या समाजात परिश्रमाचं, प्रामाणिकपणाचं, संवेदनशीलतेचं त्वरित कौतुक होत नाही, तिथे हळूहळू उत्साह मरतो. माणूस काम करतो, पण मनानं दूर जातो. तो हसतो पण आतून कोरडा होतो. कारण प्रत्येकाला पैशापेक्षा आधी शब्दांची गरज असते ती मान्यतेची, ओळखीची आणि आदराची.

आपण टीका करण्यामध्ये फार पुढे असतो; पण कौतुक करण्यात मागे पडतो. चूक दिसली की लगेच बोलतो हे काय केलंस?, तुझ्याकडून हे अपेक्षित नव्हतं. पण चांगलं काम दिसलं, की शांत राहतो. जणू काही चांगुलपणाला प्रतिसाद देणं बंधनकारक नाही. ही मानसिकता बदलण्याची वेळ आता निघून चालली आहे. मृत्यूनंतरचं कौतुक हा खरं तर आपल्या उशिरा जागे झालेल्या संवेदनांचा पुरावा असतो. अंत्यसंस्कारात उभा राहून आपण ज्या भावना व्यक्त करतो, त्या जर जिवंतपणी व्यक्त केल्या असत्या, तर कदाचित अनेक नाती अजून घट्ट राहिली असती. अनेक तुटलेली मनं वाचली असती. अनेक माणसं नैराश्याच्या कड्यावरून परत आली असती. आजच्या धावपळीच्या जगात माणूस सर्वात जास्त कशासाठी भुकेला आहे, तर तो आहे ओळखीच्या एका वाक्यासाठी. तू छान काम केलंस, तुझ्यामुळे फरक पडतो, तू आहेस म्हणून सोपं जातं ही वाक्यं औषधासारखी असतात. ती आत्मविश्वास वाढवतात. ती जगण्याची उर्मी देतात. आपण मात्र शब्द जपून ठेवतो जणू ते खर्चिक आहेत. पण खरे तर न बोललेले शब्दच सर्वात महाग पडतात. सोशल मीडियाच्या युगात हा विरोधाभास अधिक ठळक दिसतो. एखादी व्यक्ती जिवंत असताना तिच्या पोस्टवर दोन शब्द लिहायला लोक कंजूषी करतात. पण तीच व्यक्ती गेल्यावर लांबलचक पोस्ट, आठवणी, फोटो, भावनिक परिच्छेद सगळं ओसंडून वाहतं. हे प्रेम खरं असतं; पण उशिरा आलेलं असतं आणि उशिरा आलेल्या प्रेमाचं दुःख असं असतं की ते ज्याच्यासाठी असतं, त्याच्यापर्यंत पोहोचतच नाही.

आपण मुलांना शिकवतो, यशस्वी व्हा, मोठं व्हा, पुढे जा. पण आपण त्यांना हे शिकवत नाही की, जिवंत माणसाचं कौतुक करा. शाळेत गुणांना बक्षीस असतं; पण चांगल्या स्वभावाला किती वेळा दाद मिळते? कार्यालयात टार्गेट पूर्ण केल्यावर बोनस असतो; पण प्रामाणिक राहिल्याबद्दल किती वेळा अभिनंदन होतं? समाजात प्रसिद्धीला मान आहे पण शांतपणे काम करणाऱ्यांना किती वेळा व्यासपीठ मिळतं? माणूस मेल्यावर त्याला चांगला म्हणणं सोपं असतं; जिवंतपणी तू चांगला आहेस म्हणणं धैर्याचं असतं. कारण जिवंतपणी कौतुक केलं, तर आपल्याला स्वतःचा अहंकार बाजूला ठेवावा लागतो. दुसऱ्याचं मोठेपण मान्य करावं लागतं. आणि हे सगळ्यांना जमत नाही. नात्यांमधील अनेक दुरावे केवळ न बोललेल्या चांगल्या शब्दांमुळे निर्माण होतात. वडिलांनी मुलाचं कौतुक केलं नाही म्हणून मुलगा दूर जातो. पत्नीच्या कष्टांची दखल घेतली नाही म्हणून नातं कोरडं होतं. सहकाऱ्याच्या प्रामाणिक प्रयत्नांकडे दुर्लक्ष केलं म्हणून टीम तुटते. शब्द वाचवताना आपण माणसं गमावतो.

आपल्या संस्कृतीत मृत व्यक्तीबद्दल वाईट बोलत नाहीत, अशी परंपरा आहे. ती योग्य आहे. पण मग जिवंत व्यक्तीबद्दल चांगलं बोलण्याची परंपरा का नाही? श्रद्धांजली सभा भव्य होतात; पण कृतज्ञता सभा का होत नाहीत? स्मारकं उभी राहतात; पण जिवंतपणी सन्मान का उभा राहत नाही? आपण मृत्यूला आदर देतो पण जीवनाला पुरेसा आदर देत नाही. खरं तर, जिवंतपणी दिलेलं कौतुक हीच खरी श्रद्धांजली असते, माणूस जिवंत असताना त्याच्या अस्तित्वाची दखल घेणं. त्याच्या कष्टांना मान देणं. त्याच्या चांगुलपणाला शब्द देणं. कारण शब्दांमध्ये ताकद असते ते तुटलेलं मन जोडू शकतात, थकलेला जीव उभा करू शकतात. आज समाजात मानसिक ताण, नैराश्य, एकटेपण वाढतंय. लोक बाहेरून मजबूत दिसतात; पण आतून तुटलेले असतात. अशा वेळी औषधांपेक्षा जास्त परिणामकारक असतात ते प्रामाणिक कौतुकाचे शब्द, मान्यतेचा स्पर्श आणि आदराची नजर. आपण हे बदलू शकतो आज, आत्ताच. कोणासाठी मोठा कार्यक्रम करण्याची गरज नाही. फक्त मनापासून बोलण्याची गरज आहे. आईला सांगा तुझ्यामुळे घर उभं आहे. वडिलांना सांगा तुमचा






अभिमान वाटतो. मित्राला सांगा तू सोबत आहेस म्हणून धैर्य आहे. सहकाऱ्याला सांगा तुझं काम मोलाचं आहे. कौतुक म्हणजे चापलुसी नाही. कौतुक म्हणजे सत्याची कबुली.

चूक भूल देणे घेणे हा नियम आयुष्यात ज्यांना जमला त्यांना जीवन कळले असं मी म्हणेन. वाधीसाठी म्हैस मारणारी माणसं अनेक बघितली पण सगळ्या चुका पोटात घालणारी आईसारखी दुसरी व्यक्ती शोधून सापडणं कठीण आहे. माणसं समजून घ्यायला शिका. एक ताई बटाट्याची भाजी करण्यासाठी बटाटी कापत होती. अचानक तिला बटाट्याच्या वरिल बाजुला छिद्र पडलेले दिसले. तिने विचार केला की बटाटा खराब झाला आहे तो फेकून द्यावा, पण तिने तो फेकून न देता खराब झालेला तेव्हढा भाग कापून फेकून दिला. पुन्हा पाहिले असता अजून थोडा भाग खराब दिसला. तिने तो भागही कापून फेकून दिला. उरलेला बटाट्याचा अर्धा भाग कापून भाजीत टाकला. किती चांगली विचारसरणी आहे, ७० पैशांचा बटाटा आपण किती ध्यान देऊन कापतो. जो भाग खराब आहे तो कापून फेकून देतो. उरलेला भाग स्विकारतो. खुप चांगलं आहे हे. मात्र दुख या गोष्टीचं आहे की, आपण माणसाबाबत एव्हढे कठोर का वागतो? आपल्या जवळच्या एख्याद्या माणसाबाबत एक चुक दिसली तर त्याच्या पुर्ण व्यक्तीमत्वाला आपण कापून फेकून देतो. त्याच्या वर्षानुवर्षाच्या चांगल्या कामांकडे दुर्लक्ष करतो. आपण फक्त आपल्या अहंकारासाठी, मी पणासाठी त्याच्यासोबतचे प्रत्येक नाते तोडतो. मग एकच प्रश्न पडतो की, आपल्या जवळच्या माणसाची किंमत सत्तर पैशांच्या बटाट्यापेक्षाही कमी आहे का? या छोट्याशा गोष्टीचा जरूर विचार करा आणि आपल्या जवळच्या अमुल्य माणसांना लहान लहान चुकांसाठी जीवनातून वेगळे करु नका. माणूस म्हणुनी जन्मा आलो, माणूस म्हणुनी जगेल मी, हे तत्व अमलात आणा.

समाज अधिक संवेदनशील होईल, ते मोठ्या भाषणांनी नाही; तर छोट्या प्रामाणिक वाक्यांनी. माणूस जिवंत असताना त्याला तू चांगला आहेस असं ऐकायला मिळालं, तर मृत्यूनंतरच्या हजार वाक्यांची गरजच उरणार नाही. शेवटी प्रश्न एकच की, आपण पुष्पहार द्यायचा की शब्दहार? माणूस गेल्यावर तो खूप चांगला होता म्हणणं सोपं आहे. पण तो समोर उभा असताना तू खूप चांगला आहेस म्हणण्याचं धैर्य दाखवू या. कारण जिवंत माणसाला दिलेला सन्मान हाच खरा पुरस्कार असतो आणि तो मृत्यूनंतर नाही, तर आयुष्यभर मिळायला हवा.

# लासूर स्टेशन बाजार समितीत १.५ कोटींच्या सिमेंट रस्त्याचे लोकार्पण; विकासासाठी केंद्राचीही मदत घेऊ - आ. प्रशांत बंब

**आत्ताच एक्सप्रेस**

**लासूर स्टेशन (प्रतिनिधी)** गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केट यार्डात १ कोटी ५० लाख रुपये खर्च करून नवनिर्मित सिमेंट रस्त्याचे लोकार्पण शनिवारी (२२ फेब्रुवारी) उत्साहात पार पडले. आमदार प्रा. रमेश बोरणारे आणि आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते हा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने बाजार समितीच्या विकास कामांना गती देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

राजकीय टोलेबाजी आणि आश्वासने

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात आमदार प्रा. रमेश बोरणारे यांनी विरोधकांवर निशाणा साधला. ते म्हणाले की, विरोधकांनी कोर्टात जाऊन तुमचा कार्यकाळ कमी करण्याचा प्रयत्न केला, परंतु आम्ही कोर्टात कायदेशीर लढा देऊन तुमचा गेलेला कार्यकाळ पुन्हा मिळवून देऊ.

मुख्य मार्गदर्शक आमदार प्रशांत बंब यांनी बाजार समितीच्या प्रगतीसाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. बाजार समितीचे प्रस्तावित विकास प्रकल्प मार्गी लावण्यासाठी केवळ राज्याचीच नाही, तर प्रसंगी केंद्र सरकारचीही मदत मिळवून देऊ, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.




कांदा मार्केटसाठी नवीन जागेची मागणी

प्रास्ताविक करताना बाजार समितीचे सभापती शेषराव जाधव यांनी समितीने आतापर्यंत केलेली विकासकामे आणि भविष्यातील नियोजित कामांचा आढावा मांडला.

वाढती आवक पाहता कांदा मार्केटसाठी नवीन जागा खरेदी करण्याची नितांत गरज असल्याचे त्यांनी लोकप्रतिनिधींच्या निदर्शनास आणून दिले.

व्यासपीठावर अभयानंदगिरीजी महाराज, नवनिर्वाचित सदस्य संगीता आमराव, पंचायत समिती सदस्या कविता चव्हाण, सुनील पाखरे, दिनेश अंभोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बाजार समितीचे संचालक मंडळ आणि व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, ज्यात:व्यापारी प्रतिनिधी: बंटी मुथा, राजेंद्र कर्नावट, रतिलाल मुनोत, महेंद्र पांडे, विनोद जाजू, दिलीप दगडा, प्रवीण कर्नावट, महावीर पाटणी,संचालक मंडळ: संभाजी जगताप, ताहेर पटेल, अशोक जगताप, मनीष पोळ, सुरेश जाधव, भाऊसाहेब चिंधे, कैलास कुऱ्हाडे, आबासाहेब मोडके, भाऊसाहेब नेमाने.,प्रशासन: सचिव संतोष पवार व इतर कर्मचारी,कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन संचालक संतोष जाधव यांनी केले, तर उपसभापती अनिल चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### लासूर स्टेशनच्या तीन चिमुकल्यांनी जोपासली परंपरा; वयाच्या ८ व्या आणि ६ व्या वर्षी पूर्ण केला पहिला 'रोजा'



**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर (प्रतिनिधी/फिरोज मन्सुरी)** रमजानचा पवित्र महिना म्हणजे संयम, शिस्त आणि भक्तीचा काळ. याच भक्तीच्या मार्गावर चालत गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील तीन चिमुकल्या मुलींनी कडक उन्हाची तमा न बाळगता आपल्या आयुष्यातील पहिला रोजा (उपवास) अत्यंत उत्साहात पूर्ण केला आहे.

**भक्ती आणि संयमाचे दर्शन**

लासूर स्टेशन येथील रहिवासी असलेल्या आलिशा छोटू पठाण (वय ८ वर्षे), अरशिया शाहरुख पठाण (वय ८ वर्षे) आणि जारा शाहरुख पठाण (वय ६ वर्षे) या तिघींनी रमजान महिन्यातील आपला पहिला उपवास पूर्ण केला. विशेष म्हणजे, इतक्या लहान वयात पहाटेच्या 'सहरी'पासून ते संध्याकाळच्या 'इफ्तार'पर्यंत अन्नाचा कणही न घेता आणि पाण्याचा थेंबही न पिता या चिमुकल्यांनी हा रोजा पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

या चिमुकल्यांच्या यशाबद्दल आणि त्यांनी दाखवलेल्या धार्मिक ओढीबद्दल पठाण कुटुंबात आनंदाचे वातावरण आहे. त्यांचे वडील छोटू पठाण, शाहरुख पठाण आणि चुलते फारुख पठाण यांच्यासह कुटुंबातील सर्व सदस्यांनी त्यांचे मनापासून अभिनंदन केले.

लहान वयातच मुलांमध्ये धार्मिक संस्कार आणि संयमाची सवय लागावी, या उद्देशाने या मुलींनी स्वतःहून रोजा ठेवण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यांनी तो यशस्वीपणे पूर्ण केल्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, अशी भावना त्यांच्या पालकांनी व्यक्त केली.

चिमुकल्या आलिशा, अरशिया आणि जारा यांच्या या जिद्दीचे लासूर स्टेशन परिसरातील मित्र परिवार आणि नातेवाईकांकडून मोठे कौतुक होत आहे. त्यांच्या या पहिल्या रोजाच्या निमित्ताने त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

### चितेगाव टोलनाक्याजवळ दहशत पसरवणारा चाकूधारी जेरबंद; बिडकीन पोलिसांची धडक कारवाई




**आत्ताच एक्सप्रेस**

**बिडकीन (प्रतिनिधी)** सार्वजनिक ठिकाणी धारदार शस्त्र बाळगून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका इसमाला बिडकीन पोलिसांनी चितेगाव टोलनाक्याजवळ रंगेहाथ पकडले. शनिवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली असून, आरोपीकडून एक धारदार चाकू जप्त करण्यात आला आहे.

संभाजीनगर जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यात शस्त्रबंदी कायदा लागू केला आहे. असे असतानाही, पैठण तालुक्यातील चितेगाव टोलनाक्यावर एक इसम शस्त्र घेऊन येणार असल्याची गुप्त माहिती बिडकीन पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी टोलनाका परिसरात सापळा लावला.

संशयित आरोपी सूचासिंग कालूसिंग भोंड (वय ४५ वर्षे, रा. गेवराई शिवार, ब्रुक बॉण्ड कंपनी समोरील वस्ती, ता. जि. संभाजीनगर) हा परिसरात येताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे ५०० रुपये किमतीचा एक धारदार लोखंडी चाकू मिळून आला.

आरोपीकडे कोणत्याही परवान्याशिवाय शस्त्र आढळल्याने पोलिसांनी त्याला तात्काळ अटक केली. याप्रकरणी आरोपीविरुद्ध खालील कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे:

भारतीय हत्यार कायदा: कलम ४/२५

महाराष्ट्र पोलीस अधिनियम: कलम १३५

ही धडक कारवाई बिडकीन पोलीस ठाण्याचे ए.पी.आय. निलेश शेलके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात पी.एस.आय. मनोज पाटील, स.पो. सोकटकर, हेड कॉन्स्टेबल दिनेश चव्हाण, शेखर जाधव, हनुमान धनवे, धनेधर, काकडे, संजय चव्हाण आणि राठोड यांचा समावेश होता.

# खुलताबाद: जुना बसस्थानक परिसरात वाहतुकीची प्रचंड कोंडी; रमजानच्या खरेदीसाठी गर्दी, पोलीस नियोजनाचा अभाव?

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद (प्रतिनिधी)** पवित्र रमजान महिन्यानिमित्त खुलताबाद शहरातील जुना बसस्थानक आणि कुरैश मस्जिद परिसरात सायंकाळच्या वेळी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. मात्र, या गर्दीचे नियोजन करण्यात स्थानिक प्रशासन आणि पोलीस यंत्रणा अपयशी ठरत असल्याचे चित्र असून, परिसरात वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण होत आहे. विशेष म्हणजे, वाहतूक सुरळीत करण्याऐवजी पोलीस इतर कामांतच 'मग्न' असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे.

बाजारपेठ गजबजली, पण रस्ते कोंडले

रमजान महिन्यानिमित्त कुरैश मस्जिद परिसरात सध्या फळे, खजूर, ड्रायफ्रूट्स आणि विविध खाद्यपदार्थांची दुकाने थाटली आहेत. रोजा सोडण्यासाठी (इफ्तार) आवश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी मुस्लिम बांधव सायंकाळी मोठ्या संख्येने येथे जमत आहेत. येथे तात्पुरता फळबाजार भरत असल्याने संपूर्ण परिसर गजबजलेला असतो.



मात्र, याच काळात रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून पादचाऱ्यांना चालणेही कठीण झाले आहे.

अस्ताव्यस्त पार्किंगमुळे डोकेदुखी वाढली

वाहतूक कोंडीला केवळ गर्दीच नाही, तर अस्ताव्यस्त उभी केलेली वाहनेही कारणीभूत ठरत आहेत. जुना बसस्थानक परिसरात पार्किंगसाठी कोणतेही शिस्तबद्ध नियोजन नसल्याने नागरिक रस्त्याच्या कडेला कशीही वाहने उभी करत आहेत. यामुळे मुख्य रस्त्याची रुंदी कमी होऊन वाहतूक पूर्णपणे ठप्प होत आहे.

पोलीस यंत्रणेवर नागरिकांचा रोष

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलीस कर्मचारी घटनास्थळी उपस्थित नसल्याची तक्रार नागरिक करत आहेत. वाहतूक सुव्यवस्थित करण्यासाठी पोलीस तैनात असायला हवेत, परंतु ते बेपत्ता आहेत, अशा प्रतिक्रिया उमटत आहेत. इतकेच नव्हे तर, काही संतापलेल्या नागरिकांनी पोलीस वाहतूक सुरळीत करण्याऐवजी हप्ते गोळा करण्यात व्यस्त आहेत असा थेट आणि गंभीर आरोप केला आहे.

रमजानचा महिना असल्याने पुढील काही दिवस ही गर्दी कायम राहणार आहे. त्यामुळे सायंकाळच्या वेळी या परिसरात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करावा.वाहतूक वळवण्यासाठी किंवा पार्किंगसाठी पर्यायी जागा निश्चित करावी.नियम मोडणाऱ्या वाहनधारकांवर कारवाई करावी.अशी मागणी आता जोर धरत आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची दखल घेऊन संबंधित कर्मचाऱ्यांना सूचना द्याव्यात आणि नागरिकांना होणारा त्रास कमी करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# चिखला येथील घटनेचे फुलंब्रीत पडसाद; मराठा क्रांती मोर्चातर्फे पोलीस प्रशासनाला निवेदन

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री/प्रतिनिधी (सरफराज पटेल)**

बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील चिखला येथे शिवरायांच्या स्मारकावरून झालेल्या वादातून मराठा बांधव आणि भगिनींना करण्यात आलेल्या अमानुष मारहाणीचे तीव्र पडसाद फुलंब्री तालुक्यात उमटले आहेत. या घटनेचा निषेध नोंदवत मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने शनिवारी फुलंब्री पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय सहाणे यांना निवेदन देण्यात आले. आरोपींवर तातडीने गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, २० फेब्रुवारी रोजी चिखला (ता. लोणार, जि. बुलढाणा) येथे शिवरायांचे स्मारक हटविण्याच्या कारणावरून वाद झाला होता. आरोपानुसार, स्थानिक सरपंच आणि त्यांच्या समर्थकांनी शिवरायांचे स्मारक हटविण्याच्या उद्देशाने मराठा समाजातील बांधव व महिलांवर दगडफेक केली. या हिंसक घटनेत संजीवनी वाघ यांच्यासह अनेक महिलांना बेदम मारहाण झाली असून त्या गंभीर जखमी झाल्या आहेत.

स्त्रीशक्तीचा अपमान; समाजबांधवांत संताप

मराठा क्रांती मोर्चाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शिवरायांच्या स्मारकासाठी शांततेत भूमिका मांडणाऱ्या महिलांवर हात उचलणे हा अत्यंत संतापजनक प्रकार आहे. हा केवळ एका समाजावरील हल्ला नसून स्त्रीशक्तीचा अपमान आहे. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील मराठा समाजात संतापाची लाट असून, प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेणे गरजेचे आहे.

रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

या प्रकरणातील दोषींवर लवकरात लवकर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी आग्रही मागणी फुलंब्री तालुक्यातील समन्वयकांनी केली आहे.

जर प्रशासनाने आरोपींना अटक करण्यास टाळाटाळ केली, तर औरंगाबाद ते जळगाव महामार्गावर तीव्र स्वरूपाचे 'रास्ता रोको' आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

निवेदनावर उपस्थित मान्यवर

यावेळी निवेदन देताना गणेश मोटे, शुभम जगताप, बाळासाहेब भुमे, साहेबराव शिंदे, अजित भोपळे, अमोल वाहटूळे, कृष्णा दांडेकर, दिलीप वाहटूळे, संतोष जाधव, संदीप श्रीखंडे यांसह मराठा समाजातील अनेक कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंचालेश्वर येथील श्री १००८ नंदीश्वर दिगंबर जैन अतिशय क्षेत्री वार्षिक यात्रा महामहोत्सवाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आणि भारतातील एकमेव अशा श्री १००८ नंदीश्वर दिगंबर जैन अतिशय क्षेत्र, पंचालेश्वर येथे वार्षिक यात्रा महामहोत्सवाचे आयोजन दिनांक २६ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे. क्षेत्राचे अध्यक्ष गौतमचंद काला व सचिव भाऊसाहेब बाकलीवाल यांनी या संदर्भात माहिती दिली.

**छत्रपती संभाजीनगरहून भाविकांसाठी मोफत बस सेवा; विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल**

महोत्सवाचा प्रारंभ २६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता बोलींनी होणार आहे. त्यानंतर भगवंतांचा पंचामृत अभिषेक आणि शांती विधान संपन्न होईल. हा संपूर्ण सोहळा आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव, आचार्य मयंकसागरजी गुरुदेव आणि शुल्लक ऐश्वर्यसागरजी महाराज यांच्या आशीर्वादाने पार पडणार आहे. कार्यक्रमाचे विधानाचार्य म्हणून पंडित अमोल जैन धार्मिक विधी पार पाडतील.

ध्वजारोहण: अनिता राजेश नयन अनुराग गीतांश बडजाते परिवार (पाचोडवाला) यांच्या हस्ते.महाप्रसाद: स्व. हरकचंदजी काला यांच्यासह काला परिवारातील दिवंगत सदस्यांच्या स्मरणार्थ गुलाबचंदजी काला परिवार (उमापूरवाला) यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

सहकार्य: पंचरंगी पत्रिकेसाठी अजित राजेंद्र संजय सेठी परिवाराचे सहकार्य लाभले आहे.

या महोत्सवासाठी आमदार विजयराजे पंडित, माजी आमदार बदामराव पंडित, माजी आमदार लक्ष्मणराव पवार, भाऊसाहेब नाटकर, गीताभाभी बाळराजे पवार यांच्यासह जैन समाजातील प्रतिष्ठित मान्यवर जसे की महावीर पाटणी, प्रमोद कासलीवाल, एम.आर. बडजाते आणि इतर अनेक पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.



छत्रपती संभाजीनगर शहरातून यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून विशेष मोफत बस सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

ठिकाण: राजाबाजार, अरिहंतनगर, बालाजीनगर, हडको, टी.व्ही. सेंटर आणि रांजणगाव,वेळ: या सर्व बसेस सकाळी ६:०० वाजता नियोजित ठिकाणांहून प्रस्थान करतील.

या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष वृषभ गंगवाल, सुहास चुडीवाल, कोषाध्यक्ष संजय सेठी, सहसचिव विजय पापडीवाल, कैलास खोबरे, तसेच प्रकाश सेठी, विलास पहाडे, भगवानदास काला यांसह सर्व विश्वस्त मंडळ परिश्रम घेत आहेत. तरी सकल जैन समाजबांधवांनी या महोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्रचार-प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी केले आहे.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात संशोधन निबंध लेखन कार्यशाळा संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक (प्रतिनिधी)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्रच्या वतीने 'संशोधन निबंध लेखन कसे करायचे' याविषयीची एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. विद्यापीठाच्या यश इन सभागृहात झालेल्या या कार्यशाळेचे उद्घाटन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या हस्ते करण्यात आले तर समारोप विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. यावेळी कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून गुजरात गांधीनगरच्या आय. आय. टी. ई. (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्निकल एज्युकेशन) चे कुलगुरू प्रा. आर. सी. पटेल, नवी दिल्लीतील निपाच्या (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनल प्लॅनिंग अँड डमिनिस्ट्रेशन) सहाय्यक प्राध्यापिका डॉ. कश्यपी अवस्थी, विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्राचे संचालक प्रा. व्ही. बी. गायकवाड, विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा तथा प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्राच्या संचालिका आणि व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. संजीवनी महाले यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदर कार्यशाळेत ६६ संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक तथा शैक्षणिक संयोजक यांनी सक्रिय सहभाग घेतला.

कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी बोलतांना विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी संशोधन लेख हा तर्कसंगत मांडणी करणारा, समस्या उकल करणारा, त्यावर उपाय सुचवणारा असावा असे सांगितले.

संशोधन लेखनासाठी काही विषय सुचवताना त्यांनी संशोधन लेखनात तंत्रज्ञानाच्या उपयोगासोबत संशोधकाचे वाचन - मनन प्रकर्षाने दिसून आले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. तत्पूर्वी कार्यशाळेच्या आपल्या उद्घाटनपर भाषणात विद्यापीठाचे मा. प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी विद्यापीठे ही समाजाची उर्जास्थाने असून येथून समाजोपयोगी संशोधनास चालना मिळत असल्याचे सांगितले.

# गंगापूर तालुक्यात अवैध वाळू उपशावर पोलीस व महसूल विभागाचा 'सर्जिकल स्ट्राईक'; २० ब्रास वाळूसह हायवा जप्त

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ (सुभान शहा)** 'दैनिक आत्ताच एक्सप्रेस'मध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीची प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून, गंगापूर तालुक्यातील



वाळू माफियांवर मोठी कारवाई करण्यात आली आहे. ममदापूर, कानडगाव आणि नेवरगाव शिवारातील गोदावरी नदीकाठी सुरू असलेल्या अवैध वाळू उपशावर पोलीस आणि महसूल विभागाने मध्यरात्री संयुक्त छापा टाकला. या कारवाईत २० ब्रास वाळू आणि एक हायवा वाहन जप्त करण्यात आले असून, यामुळे वाळू माफियांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.

काही दिवसांपासून या परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा सुरू असल्याची चर्चा होती. 'आत्ताच एक्सप्रेस'ने या संदर्भात वृत्त प्रसिद्ध करताच प्रशासन खडबडून जागे झाले. २१ फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली ही धाड टाकण्यात आली.

संयुक्त पथकाची कामगिरी

या मोहिमेत पोलीस निरीक्षक




कुमारसिंग राठोड आणि महसूल अधिकारी रत्नाकर पांचाळ यांच्या नेतृत्वाखालील पथकाने कानडगाव-नेवरगाव शिवारात अचानक छापा टाकला. यावेळी अवैधरित्या उपसा करून साठवून ठेवलेली २० ब्रास वाळू आणि वाहतुकीसाठी वापरण्यात येणारा एक छोटा हायवा जप्त करण्यात आला. ही कारवाई मध्यरात्री झाल्याने वाळू माफियांना पळ काढण्याची संधीही मिळाली नाही.

या धडक कारवाई दरम्यान मंडळ अधिकारी श्रीनिवास गवळी, ग्राम महसूल अधिकारी ब्रिजेश पारवे, सुरेश ठेंगडे, तसेच पोलीस कॉन्स्टेबल भागवत खाडे, विठ्ठल जाधव आणि संबंधित गावांचे पोलीस पाटील व महसूल कर्मचारी उपस्थित होते.जप्त केलेली वाळू आणि हायवा वाहन सध्या पोलीस पाटलांच्या ताब्यात देण्यात आले असून, संबंधितांवर कायदेशीर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तालुक्यात कुठेही अवैध वाळू उपसा खपवून घेतला जाणार नाही, दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# ढालसखेडा येथे शिवजयंतीनिमित्त भव्य सूर्यनमस्कार स्पर्धा संपन्न; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**आत्ताच एक्सप्रेस**

**ढालसखेडा (प्रतिनिधी)** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ढालसखेडा येथे भव्य सूर्यनमस्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

मान्यवरांची उपस्थिती आणि प्रतिमा पूजन

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक प्रशांतजी कानडे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून योगशिक्षक गजानन पांडुरंग पुरी उपस्थित होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी महाराजांच्या अष्टप्रधान राज्यपद्धती, स्त्रीसन्मान आणि राष्ट्रनिष्ठा या मूल्यांविषयी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शुभम जाधव, उपाध्यक्ष अन्वर भाई पठाण, सरपंच बाळू जाधव, उपसरपंच उमेश जाधव यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धेत विद्यार्थ्यांनी कमालीची एकाग्रता आणि शारीरिक लवचिकता दाखवली. योगशिक्षक गजानन पुरी यांनी मंत्रोच्चारासह सूर्यनमस्काराच्या बारा स्थितींचे शास्त्रोक्त सादरीकरण केले. स्पर्धेचा निकाल



खालीलप्रमाणे राहिला.

प्रथम क्रमांक: आरती गोळेढ,द्वितीय क्रमांक: जयदीप उबाळे,तृतीय क्रमांक: श्यामल जऱ्हाड,चतुर्थ क्रमांक: मनीषा माने विशेष प्रात्यक्षिके सादर करणाऱ्या वैष्णवी मुळे व दिव्या साबळे या विद्यार्थिनींचेही विशेष कौतुक करण्यात आले. विजेत्यांना शुभम जाधव यांच्या वतीने सुवर्णपदक व शैक्षणिक साहित्य देऊन गौरवण्यात आले.

मुख्याध्यापक प्रशांत कानडे यांनी विद्यार्थ्यांना शिवरायांच्या विचारांतून आदर्श नागरिक बनण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचा समारोप सामूहिक शपथेने झाला, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी आरोग्य, शिस्त आणि राष्ट्रनिष्ठा जोपासण्याचा संकल्प केला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षकवृंद, अंगणवाडी सेविका आणि ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# आष्टीतील अवैध दारूचा 'आका' कोण?

## पोलिसांच्या नाकाखाली फोफावतोय काळबाजार!

**आत्ताच एक्सप्रेस**

**परतूर (प्रतिनिधी/अंगद मुंढे)** तालुक्यातील आष्टी परिसरात अवैध देशी दारूचा महापूर लोटला असून, या व्यवसायाने आता गंभीर स्वरूप धारण केले आहे.

गल्लोगल्ली मिळणारी ही अवैध दारू कुठून येते? याचा शोध घेतल्यास थेट आष्टीतील अधिकृत देशी दारूच्या दुकानापर्यंत धागेदोरे जातात. मात्र, ज्यांनी यावर कारवाई करायची, ते पोलीस प्रशासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग 'तेरी भी चुप्प, मेरी भी चुप्प' या भूमिकेत असल्याने सामान्य जनतेतून संताप व्यक्त होत आहे.

**मुख्य दुकानावर कारवाई का नाही?**

अवैध दारू विक्री करणारा छोटा विक्रेता हा केवळ एक प्यादे आहे, पण त्याला रसद पुरवणारा 'आका' हा आष्टीतील अधिकृत दारू दुकानदार आहे. दिवसाढवळ्या मोटारसायकलवरून दारूचे बॉक्स गावखेड्यात पोहोचवले जातात. पोलिसांना हे दिसत नाही की अर्थपूर्ण व्यवहारामुळे ते डोळे मिटून घेतात? असा सवाल आता नागरिक विचारत आहेत.

**मुळ प्रश्नावर घाला:** जर अवैध विक्री रोखायची असेल, तर ज्या दुकानातून बॉक्सचा पुरवठा होतो, त्या मालकावर कारवाई का केली जात नाही? जप्त केलेल्या बाटलीवरील 'बॅच नंबर' वरून ती कोणत्या दुकानातील आहे हे सहज स्पष्ट होते, मग त्या दुकानदाराचा परवाना रद्द करण्यासाठी पावले का उचलली जात नाहीत?

**तरुणाई उद्ध्वस्त, कायदा-सुव्यवस्था धोक्यात!**

सार्वजनिक ठिकाणी आणि वस्त्यांमध्ये उघडपणे होणाऱ्या या विक्रीमुळे आष्टीतील तरुण पिढी व्यसनाच्या आहारी गेली आहे. अनेक सुखी संसार उध्वस्त होत असून, किरकोळ वादातून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. झटपट श्रीमंत होण्याच्या नादात अनेक युवक या अवैध धंद्याकडे ओढले जात आहेत, ज्याला खतपाणी घालण्याचे काम आष्टीतील ते **'मुख्य दुकान'** करत आहे.

**प्रशासनाचा 'अर्थपूर्ण' तमाशा?**

काही दिवसांपूर्वी एपीआय गणेश सुरवसे यांनी कारवाया केल्या, परंतु मूळ पुरवठादारापर्यंत पोलीस पोहोचलेच नाहीत. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी प्रवीण ठाकूर यांनी आम्ही फक्त अहवाल पाठवू शकतो, परवाना रद्द करण्याचा अधिकार वरिष्ठांचा आहे असे सांगून आपली जबाबदारी झटकली आहे. प्रशासनाच्या या हतबलतेमुळे की संगनमतामुळे हा अवैध धंदा फोफावतोय, हा आता संशोधनाचा विषय ठरत आहे.

**आमचा थेट सवाल:**

-अवैध विक्रेत्यांना बॉक्स पुरवणाऱ्या **'त्या'** बड्या दुकानदाराच्या मुसक्या कधी आवळणार?

-जप्त बाटल्यांच्या 'बॅच नंबर'ची चौकशी करून दुकानावर कारवाई होणार का?

-आष्टी पोलीस आणि उत्पादन शुल्क विभाग या 'आका'च्या गळ्यात घंटी कधी बांधणार?

-जर वेळीच या मुख्य अड्ड्यावर कारवाई झाली नाही, तर आष्टी परिसरातील जनक्षोभ उसळण्याची शक्यता नाकारता येत नाही.




# पंतप्रधान मोदींच्या 'मन की बात'मधून कार्यकर्त्यांना मिळाली नवचेतना; जालना महानगरात उत्साहात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या **'मन की बात'** या मासिक रेडिओ कार्यक्रमाचे आयोजन जालना महानगर जिल्ह्यात प्रत्येक बूथ स्तरावर करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून पंतप्रधानांनी मांडलेल्या देशहिताच्या विचारांमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह आणि नवचेतना निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केले.

बूथ स्तरावर कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग

रविवारी सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम पार पडला. जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी प्रभाग क्र. १ मधील बूथवर उपस्थित राहून स्थानिकांसह हा कार्यक्रम ऐकला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, पंतप्रधान मोदींचे मार्गदर्शन हे प्रत्येक कार्यकर्त्यासाठी ऊर्जेचा स्रोत आहे. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' या मंत्राचा अवलंब करत केंद्र सरकारने जनहितार्थ अनेक कल्याणकारी योजना राबवल्या आहेत. या योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवणे ही प्रत्येक कार्यकर्त्याची जबाबदारी आहे.

संघटनात्मक बांधणीवर भर

पक्ष संघटन अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक बूथ स्तरावर कार्यकर्त्यांनी सक्रिय राहणे आवश्यक असल्याचे आवाहनही दानवे यांनी यावेळी केले. जालना महानगरातील विविध मंडळांमध्ये हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला:

नवीन जालना मंडळ: अध्यक्ष सुनील खरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन,जुना जालना मंडळ: अध्यक्ष महेश निकम यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम संपन्न,पूर्व जालना मंडळ: अध्यक्ष अमोल धानुरे यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांचा सहभाग,जालना ग्रामीण: तालुकाध्यक्ष संजय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबवण्यात



आला.,विविध आघाड्यांची उपस्थिती या कार्यक्रमाला केवळ पदाधिकारीच नव्हे, तर सर्वसामान्य नागरिकांनीही मोठी गर्दी केली होती. यामध्ये प्रामुख्याने महिला मोर्चा व युवा मोर्चा,व्यापारी आघाडी,अनुसूचित जाती-जमाती मोर्चा,अल्पसंख्याक मोर्चा या सर्व आघाड्यांचे प्रमुख पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, नगरसेवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहराच्या कानाकोपऱ्यात आणि ग्रामीण भागातही 'मन की बात' कार्यक्रमाचा मोठा प्रभाव दिसून आला.

# भागीदारीच्या नावाखाली जालन्यातील व्यापाऱ्याची ३० लाखांची फसवणूक

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** शहरातील एका प्रतिष्ठित फळ व भाजीपाला घाऊक व्यापाऱ्याला भागीदारी आणि नफ्याचे आमिष दाखवून ३० लाख २५ हजार रुपयांना गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पीडित व्यापाऱ्याने पोलीस अधीक्षकांकडे (SP) धाव घेऊन दोषींविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली आहे.

**निवृत्त पोलीस कर्मचाऱ्याच्या मुलावर गंभीर आरोप**

आरोपी हा एका निवृत्त पोलीस कर्मचाऱ्याचा मुलगा असल्याची माहिती समोर आल्याने शहरात खळबळ उडाली आहे.



पेन्शनपुरा भागातील रहिवासी मोहम्मद उमर जाफर (वय ३७) आणि रहीम नगर येथील मोहम्मद सकलैन मो. मोईन यांची गेल्या ८-१० वर्षांपासून ओळख होती. फेब्रुवारी २०२३ मध्ये आरोपी सकलैन याने उमर जाफर यांना भंगार आणि वेस्टेज बारदानाच्या व्यवसायात भागीदारीचा प्रस्ताव दिला. मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केल्यास आकर्षक नफा मिळेल, असे आमिष त्याने जाफर यांना दाखवले.

बँक कर्ज काढून गुंतवले पैसे

उमर जाफर यांनी सुरुवातीला आर्थिक अडचण व्यक्त केली होती. मात्र, आरोपीने त्यांना बँकेतून कर्ज घेण्यास प्रवृत्त केले व कर्जाचे हप्ते मीच भरेन, असे आश्वासन दिले. या विश्वासापोटी जाफर यांनी जालना येथील मुख्य टपाल कार्यालयातील ए.यू. बँकेच्या खात्यातून फेब्रुवारी ते ऑगस्ट २०२३ दरम्यान एकूण ३०,२५,००० रुपये आरोपीच्या 'गौस ट्रेडर्स' या फर्मच्या खात्यात ऑनलाइन ट्रान्सफर केले.

फसवणुकीचा असा झाला उलगडा

रक्कम घेऊनही आरोपीने जाफर यांना व्यवसायात भागीदारी दिली नाही आणि नफ्याचा हिस्साही दिला नाही. जेव्हा जाफर यांनी आपल्या पैशांची मागणी केली, तेव्हा आरोपीने त्यांना बंद पडलेल्या बँक खात्याचे धनादेश (Checks) देऊन दिशाभूल केली. पैसे परत मागितल्यास आरोपी आणि त्याच्या कुटुंबीयांनी त्यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे.

प्रकरणातील महत्त्वाचे मुद्दे:

साक्षीदार: हा संपूर्ण व्यवहार मौलाना सय्यद जमील यांच्या उपस्थितीत झाला असून त्यांना या प्रकरणात साक्षीदार करण्यात आले आहे.इतर गुन्हे: आरोपीविरुद्ध अहमदनगर (अहिल्यानगर) आणि मुंबई येथेही फसवणुकीचे गुन्हे दाखल असल्याची चर्चा आहे.पासपोर्ट जप्तीची मागणी: आरोपी वारंवार दुबईला जात असल्याने तो देश सोडून पळून जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्याचा पासपोर्ट जप्त करण्याची मागणी करण्यात आली आहे.

आरोपीचे वडील निवृत्त पोलीस कर्मचारी असल्याने पोलीस तपासावर प्रभाव पडू शकतो, अशी भीती पीडित पक्षाने व्यक्त केली आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात आज, सोमवारी शहरातील एका शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन दिले आहे.

# भोकरदन बसस्थानक परिसरात 'पोलीस मदत केंद्रा'ची स्थापना; प्रवाशांना मिळणार सुरक्षा अन् दिलासा

**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकरदन/ प्रतिनिधी/ सोपान प्र. सपकाळ/** भोकरदन शहरातील मध्यवर्ती बसस्थानक परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली पोलीस चौकीची मागणी अखेर पूर्ण झाली आहे. रविवारी दुपारी बसस्थानक परिसरात पोलीस मदत केंद्राची (चौकी) अधिकृतपणे स्थापना करण्यात आली असून, यामुळे प्रवाशांसह नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.

बसस्थानकावर वाढती गर्दी आणि त्यातून उद्भवणारे सुरक्षेचे प्रश्न लक्षात घेता, येथे पोलीस चौकी असावी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जात होता. काही दिवसांपूर्वीच भोकरदन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी गजानन तायडे, पोलीस निरीक्षक किरण बिडवे आणि एसटी बसस्थानक प्रमुख कड यांनी जागेची संयुक्त पाहणी केली होती. पोलीस निरीक्षक बिडवे व त्यांच्या सहकाऱ्यांनी या प्रस्तावाचा वरिष्ठ कार्यालयाकडे सातत्याने पाठपुरावा केला, ज्याला आता यश आले आहे.

क्रेनच्या साहाय्याने चौकीची स्थापना

रविवारी दुपारी पोलीस उपनिरीक्षक पवन राजपूत




व त्यांच्या सहकाऱ्यांच्या उपस्थितीत क्रेनच्या साहाय्याने एक सुसज्ज 'तयार शेड' (Ready Cabin) बसस्थानक परिसरात निश्चित केलेल्या जागी कार्यान्वित करण्यात आले. यावेळी पोलीस कर्मचाऱ्यांसह स्थानिकांची मोठी उपस्थिती होती.

या समस्यांवर मिळणार लगाम

या पोलीस मदत केंद्रामुळे बसस्थानक आणि परिसरात होणाऱ्या खालील समस्यांवर नियंत्रण मिळवणे सोपे होणार आहे.**चोरीच्या घटना:** बसस्थानकावर गर्दीचा फायदा घेऊन होणाऱ्या मोबाईल व पाकीटमारीच्या घटनांना चाप बसेल.**महिलांची सुरक्षा:** महाविद्यालयीन युवती व महिला प्रवाशांच्या छेडछाडीचे प्रकार रोखण्यास मदत होईल. **वाहतूक कोंडी:** छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोरील चौकात होणारी नित्याची वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी येथून पोलिसांना लक्ष ठेवणे सोपे जाईल.**तातडीची मदत:** कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत प्रवाशांना आता मुख्य पोलीस ठाण्याकडे धाव न घेता, बसस्थानकावरच तात्काळ मदत उपलब्ध होईल.या निर्णयामुळे भोकरदन शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत होणार असून, प्रवाशांच्या चेहऱ्यावर सुरक्षिततेचा विश्वास दिसत आहे.

# विनातिकीट प्रवाशांचे धाबे दणाणले!

## नांदेड रेल्वे विभागाचा सर्जिकल स्ट्राईक; एका महिन्यात १.२५ कोटींचा दंड वसूल

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड/प्रतिनिधी/** रेल्वे प्रवासात शिस्त मोडणाऱ्या आणि शासनाचा महसूल बुडवणाऱ्या प्रवाशांविरुद्ध दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने 'आक्रमक' पवित्रा घेतला आहे. जानेवारी २०२६ या एकाच महिन्यात राबविलेल्या 'सघन तिकीट तपासणी मोहिमे'त तब्बल २१,७२४ विनातिकीट व अनियमित प्रवाशांवर कडक कारवाई करण्यात आली. या मोहिमेतून रेल्वेने १ कोटी २५ लाख १७ हजार २९० रुपयांचा विक्रमी दंड वसूल केला आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत वसुलीत १५.०१% वाढ झाली असून, फुकट्या प्रवाशांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

२१९ कर्मचाऱ्यांचा फौजफाटा; रात्रभर चालल्या धाडी!नांदेड विभागाचे वरिष्ठ मंडल वाणिज्य व्यवस्थापक डॉ. विजय कृष्णा यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम युद्धपातळीवर राबवण्यात आली. यामध्ये २१९ तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांचा समावेश होता, ज्यांना ठझत्र (रेल्वे सुरक्षा बल)



जवानांनी साथ दिली.तपासणीचे स्वरूप: १२ फोर्ट्रेस तपासण्या, २ मॅसिव्ह (प्रचंड) तपासण्या आणि १५ अचानक घेतलेल्या रात्रीच्या धाडींमुळे विनातिकीट प्रवाशांना पळता भुई थोडी झाली.कुठे झाली कारवाई? आदिलाबाद-नांदेड, परभणी-परळी आणि छत्रपती संभाजीनगर-मनमाड यांसारख्या प्रमुख रेल्वे मार्गांवर प्रशासनाने जाळे विणले होते.४ जानेवारीला रेल्वेचा दणका: एकाच दिवसात ९०९ केसेस!या मोहिमेचा सर्वात मोठा फटका ४ जानेवारी २०२६ रोजी बसला. या एकाच दिवशी रेल्वेने ९०९ जणांवर कारवाई करत ५ लाख ४८ हजार ७३८ रुपये दंड वसूल केला. ही या महिन्यातील सर्वात मोठी एकदिवसीय कारवाई ठरली आहे.

आकडेवारी एका नजरेत: तपशील माहिती एकूण गुन्हे (Cases) २१,७२४ एकूण दंड वसुली १,२५,१७,२९० गतवर्षाच्या तुलनेत वाढ १५.०१%तिकीट हस्तांतरण प्रकरणे७५ही मोहीम केवळ दंडासाठी नाही, तर प्रामाणिक प्रवाशांचा प्रवास सुखकर व्हावा आणि रेल्वेचा महसूल सुरक्षित राहावा यासाठी आहे. प्रवाशांनी 'रेलवन' (RailOne) सारख्या डिजिटल पचा वापर करून वैध तिकीटासहच प्रवास करावा, अन्यथा कारवाई अटळ आहे. - डॉ. विजय कृष्णा, वरिष्ठ मंडल वाणिज्य व्यवस्थापक, नांदेड विभाग.

रेल्वेचा इशारा: डिजिटल व्हा, नाहीतर दंड भरा!रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, यापुढेही अशा मोहिमा सातत्याने राबविल्या जातील. प्रवाशांनी तिकिटासाठी रांगेत उभे न राहता 'रेलवन' पचा वापर करावा. विनातिकीट प्रवास करणे हा गुन्हा असून, अशा प्रवाशांवर यापुढेही कठोर फौजदारी कारवाई करण्याचे संकेत नांदेड विभागाने दिले आहेत.

# ह.भ.प. योगेश महाराज गायके यांना 'राष्ट्रसंत गाडगे महाराज सेवारत्न गौरव पुरस्कार २०२६' जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/गेवराई (प्रतिनिधी)** समाजसेवा आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम साधत, समाजातील उपेक्षितांच्या जीवनात प्रकाश पेरणाऱ्या ह.भ.प. योगेश महाराज गायके (गौंडगावकर) यांना यावर्षीचा मानाचा 'राष्ट्रसंत गाडगे महाराज सेवारत्न गौरव पुरस्कार २०२६' जाहीर करण्यात आला आहे. गेवराई येथील प्रसिद्ध 'संघर्ष सामाजिक धान्य बँक' यांच्या वतीने या पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून, योगेश महाराज यांच्या सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रातील अतुलनीय योगदानाचा हा गौरव ठरणार आहे.सेवेचा वारसा आणि सामाजिक बांधिलकीह.भ.प. योगेश महाराज गायके हे केवळ अध्यात्मिक क्षेत्रातील नाव नसून, पोलीस ठाणे तीर्थपुरी येथे कार्यरत असतानाही त्यांनी आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. कीर्तन, प्रवचन आणि समाजप्रबोधनाच्या माध्यमातून त्यांनी समाजात सकारात्मक परिवर्तनाची लाट निर्माण केली आहे. त्यांच्या कार्याचे काही प्रमुख पैलू खालीलप्रमाणे आहेत:व्यसनमुक्ती व अंधश्रद्धा निर्मूलन: कीर्तनाच्या माध्यमातून तरुणांना व्यसनांपासून परावृत्त करणे आणि समाजात पसरलेल्या अंधश्रद्धेवर प्रहार करणे.मदत कार्य: गरजू कुटुंबांना अन्नधान्य पुरवणे, आपत्तीग्रस्तांना तात्काळ मदत करणे आणि गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करणे.प्रबोधन: संतांच्या विचारांची पेरणी करून सामाजिक सलोखा राखण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणे. पुरस्कार सोहळ्याचे नियोजनहा गौरव सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न होणार असून त्याचे नियोजन खालीलप्रमाणे आहे:तपशीलमाहितीदिनांक२३ फेब्रुवारी २०२६वेळसायंकाळी ५:०० वाजतास्थळजिल्हा परिषद माध्यमिक शाळा, गेवराई, जि. बीडया सोहळ्यास परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, कीर्तनकार, समाजसेवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. आयोजक आणि सहकार्यसंघर्ष सामाजिक धान्य बँक, गेवराईच्या वतीने या पुरस्काराची निवड करण्यात आली आहे. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवाजी झेंडेकर सर, सुभाष काळे सर, संजय पांढरे सर, सुरेश भोपळे सर, धर्मराज करपे सर, बाळासाहेब गावडे सर, सुरेश नवले सर



आणि भारत भाऊ साळुंखे यांच्यासह धान्य बँक टीमचे विशेष सहकार्य लाभले आहे. आवाहन: राष्ट्रसंत गाडगे महाराजांच्या 'जनसेवा हीच ईश्वर सेवा' या विचाराला पुढे नेणाऱ्या या सोहळ्यास सर्व नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन संघर्ष सामाजिक धान्य बँक टीमच्या वतीने करण्यात आले आहे.

**गेवराईत २३ फेब्रुवारी रोजी रंगणार दिमाखदार सोहळा; संघर्ष सामाजिक धान्य बँकेचा उपक्रम**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813